॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत केलेल्या आवाहनास अनुसरून व मा.ना.चंद्रकांतदादा पाटील,मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या वाढदिवसाचे औचीत्त साधून 'एक पेड मां के नाम २.०' अंतर्गत विद्यापीठात वृक्ष लागवड हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या वृक्ष लागवड कार्यक्रमाप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी,प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक प्रा.योगेश पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखाचे अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, वित्त व लेखाअधिकारी सीए.रवींद्र पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांचे हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

सदर प्रसंगी प्र.उद्यान अधिक्षिका अश्विनी पाटील, धनदाई महाविद्यालयाचे प्रा. शैलेश पाटील, रासेयो कक्षाचे कक्ष अधिकारी शरद पाटील, जगदीश शिवदे, शिवाजी पाटील, चिंतामण सोनवणे, से.नि.कर्मचारी श्री.आर.टी.बाविस्कर, श्री.कैलास औटी, दै.वेतनिक सौरभ साबळे, वैभव बाविस्कर, अधिकार पाटील, आकाश भामरे, तसेच रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी,विद्यार्थिनी यांनी उत्साहात सहभाग नोंदवून ७१ वृक्ष त्यात आंबा, वड, चिंच, पिंपळ, निंब इत्यादी वृक्षाची लागवड करण्यात आली.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १० जून, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता